दिनांक 11 /05/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.16

विषय – विटा नगरपरिषदेसाठी स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत फिरते शौचालय खरेदी करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी सह.भांडार पर्यवेक्षक यांची दिनांक 03/05/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी

देशातील सर्व शहरांमधील नागरिकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे, याकरिता केंद्र शासनाच्या "स्वच्छ भारत अभियान (नागरी)" च्या धर्तीवर स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)" ची अंमलबजावणी सुरु आहे. विविध शहरांना स्वच्छ महाराष्ट्र अभियानाअंतर्गत विविध प्रकल्पांकरिता निधी वितरीत करण्यात आला होता. परंतु जे प्रकल्प पूर्ण होऊ शकत नाहीत अशा प्रकल्पांकरिता देण्यात आलेला निधी परत घेऊन त्याऐवजी घनकचरा व्यवस्थापनाकरिता आवश्यक वाहने खरेदी करण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव राज्य अभियान संचालक यांच्यामार्फत मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीच्या मान्यतेकरिता सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास उच्चाधिकार समितीने मान्यता दिली आहे.

सदर संदर्भीय शासन निर्णयानुसार शहरांना घनकचरा व्यवस्थापनाकरिता आवश्यक वाहने खरेदी करण्यास शासनाकडून मान्यता देणेत आली आहे. विटा शहरासाठी फिरते शौचालयसाठी रक्कम रुपये 13,06,680/- इतका निधी मंजुर केला आहे.

तरी सदरचे फिरते शौचालय खरेदी करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा

विषय :- घनकचरा व्यवस्थापन करिता आवश्यक वाहने खरेदी करणेबाबत.
संदर्भ :-. भांडार विभागाची दि.28/04/2023 ची मुख्याधिकारी यांची मंजुर टिपणी.

---

देशातील सर्व शहरांमधील नागरिकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे, याकरिता केंद्र शासनाच्या “स्वच्छ भारत अभियान (नागरी)” च्या धर्तीवर “स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)” ची अंमलबजावणी सुरु आहे. याअंतर्गत विविध शहरांना स्वच्छ महाराष्ट्र अभियानाअंतर्गत विविधप्रकल्पांकरिता निधी वितरीत करण्यात आला होता. परंतु जे प्रकल्प पूर्ण होऊ शकत नाहीत अशाप्रकल्पांकरिता देण्यात आलेला निधी परत घेऊन त्याऐवजी घनकचरा व्यवस्थापनाकरिता आवश्यक वाहनेखरेदी करण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव राज्य अभियान संचालक यांच्यामार्फत मा. मुख्य सचिव यांच्याअध्यक्षतेखालीलउच्चाधिकार समितीच्या दि.०३/०३/२०२३ रोजीच्या बैठकौमध्ये मान्यतेकरिता सादरकरण्यात आला होता. सदर प्रस्तावास उच्चाधिकार समितीने त्याच बैठकीमध्ये मान्यता दिली आहे.

सदर संदर्भीय शासन निर्णयानुसार शहराना घनकचरा व्यवस्थापनाकरिता आवश्यक वाहने खरेदीकरण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. विटा शहरासाठी खालील प्रमाणे वाहन व मशीन खरेदी करिता रक्कम रुपये ९८,००,०००/- इतका निधी मंजुर केला आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| अ.क्र | तपशील | किंमतरु | मंजुर नग/ संख्या | एकूण होणारी किंमत |
|---|---|---|---|---|
| A | १ | २ | ३ | ४ |
| १ | Refused Compactor | ३०,००,००० | १ | ३०,००,००० |
| २ | Tractor | ३,८०,००० | २ | ७,६०,००० |
| ३ | Bailing Machine | ४,००,००० | २ | ८,००,००० |
| ४ | Four Wheel Auto Tipper | १०,००,००० | ४ | ४०,००,००० |
| ५ | Hand Carts | १०,००० | २४ | २,४०,००० |
| ६ | Three Wheeler Auto Tipper | ५,००,००० | २ | १०,००,००० |
| | | | एकूण रक्कम | ९८,००,०००/- |

पान नं.२ वर

परंतू संदर्भीय नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. स्वमअ-२०२३/प्र.क्र.३८(२)/नावि-३४ दि. २०/०३/२०२३ मधील नमूद रीफ्युस्ड कॉम्पॅक्टर -नग-१ हे सध्या नगरपरिषदेकडे उपलब्ध आहे. तसेच नगरपरिषदेमार्फत १००% घरोघरी जाऊन कचरा गोळा केला जातो. विटा नगरपरिषदही बिन फ्री सिटी असल्याने शहरात मोठ्या कुंड्या नाहीत सबब रीफ्युस्ड कॉम्पॅक्टरची नगरपरिषदेस आवश्यकता नाही. याऐवजी दुसरे वाहन मंजूर करणेबाबत कार्यवाही करणेबाबतचे पत्र नगरपरिषदेने जावक क्रमांक 358 दिनांक 10/05/2023 ने शासनासपाठविले आहे. शासन मंजुरी प्राप्त झालेनंतर उचित कार्यवाही करणेत येईल.

तरी वरील शासन निर्णयातील रीफ्युस्ड कॉम्पॅक्टर सोडून बाकीची वाहने खरेदी करण्यास मान्यता मिळावी. खालील तक्त्यामध्ये नमूद वाहने/मशीन खरेदी करण्यास मान्यता मिळावी.

| अ.क्र | तपशील | किंमतरु | मंजुर नग/ संख्या | एकूण होणारी किंमत |
|---|---|---|---|---|
| A | १ | २ | ३ | ४ |
| १ | Tractor | ३,८०,००० | २ | ७,६०,००० |
| २ | Bailing Machine | ४,००,००० | २ | ८,००,००० |
| ३ | Four Wheel Auto Tipper | १०,००,००० | ४ | ४०,००,००० |
| ४ | Hand Cart | १०,००० | २४ | २,४०,००० |
| ५ | Three Wheeler Auto Tipper | ५,००,००० | २ | १०,००,००० |
| | | | एकूण रक्कम | ६८,००,०००/- |

सदर खरेदी ही शासनाच्या GEM पोर्टल वरून खरेदी करणेबाबत वरील नमूद संदर्भानूसार आदेश प्राप्त आहेत. सदर वाहनांची किंमत खरेदी वेळी मंजूर किंमती पेक्षा जास्त असल्यास येणार खर्च हा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी करणेबाबत कळविले आहे . तरी सदर खरेदी वेळी मंजूर किंमती पेक्षा जास्त येणारा खर्च नगरपरिषद किंवा इतर अनुदानातून करणे उचित राहील.

वाढती लोकसंख्या व त्यानुसार आवश्यक वाहनाचा विचार केला असता विटा शहराचा घनकचरा व्यवस्थापनासाठी कचरा उठाव करणे करीत सध्याची उपलब्ध वाहने अपुरी पडू शकतात तसेच स्वच्छ महाराष्ट्र अभियान २ मधून भविष्यात वाहनाकरिता निधी उपलब्ध होणार नसले बाबत बैठकीत सांगित्लेमुळे संदर्भीय शासन निर्णयामध्ये नमूद वाहने खरेदी करणे आवश्यक वाटते .

तरी स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) मधून प्राप्त निधी मधून सादर खरेदी करणे हरकतीचे नाही.

पान नं.३ वर

तरी नमूद संदर्भीय विषयान्वये घनकचरा व्यवस्थापन करिता रीफ्युस्ड कॉम्पॅक्टर सोडून इतर आवश्यक व मंजूर वाहने खरेदी करणेस व अतिरिक्त सदर खरेदी वेळी मंजूर किंमती पेक्षा जास्त येणारा खर्च नगरपरिषद किंवा उपलब्ध इतर अनुदानातून करणेस मंजुरी देणेत येत आहे. तसेच तरी याकामी पुढील आवश्यक ती नियमबद्ध कार्यवाही करणेत यावी.

सही/-
(संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा.